**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९९ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. गुलाम हुसेन कासीमसाो शेख<br>६१०/११, उत्तर कसबा, सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्य अधीक्षक,<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त (वि)<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |

सोलापूर शहरातील मटण, मांस, बीफ, चिकन सेंटर परवाना लायसन्स बाबतची माहिती अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा मुख्य अधीक्षक, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. दि. ११.४.२००७ रोजी माहिती दिली, परंतु ती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद करून अपीलकर्त्याने अपिलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त (वि), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे अपील केले.

अपिलीय प्राधिकाऱ्यांनी पाच दिवसांत माहिती देण्याचा आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दिला. त्यानुसार पूर्ण माहिती दि. १८.५.२००७ रोजी देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती ही प्रत्यक्ष कार्यरत व्यावसायिकांची संख्या, कर्मचाऱ्यांची संख्या यापेक्षा भिन्न आहे, त्याबाबत पुरावे देण्यास आपण तयार आहोत, असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेचे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तत्त्व लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी यांनी याबाबतच्या नेमक्या तपशिलासह अचूक माहिती देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलकर्त्याने संबंधित पुरावे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना सादर करावे व त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीच्या अचूकतेची खातरजमा करून पंधरा दिवसांत आयोगाला अहवाल सादर करावा.

पुणे
दि. २८.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रभाकर रघुनाथ माने
५१ अ बुधवार पेठ, अगत्य हॉटेल शेजारी
पुणे -४११ ००२

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सहाय्यक अभियंता (बांधकाम विभाग),
पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
नगर अभियंता (बांधकाम विभाग),
पुणे महानगरपालिका, पुणे

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ६.१६/ पुणे | २१.११.२००६ | २९.११.२००६ | २२.१२.२००६ | ८.१.२००७ |
| ६३५ / पुणे | ४.१२.२००६ | १३.१२.२००६ | ९.१.२००७ | -- |
| ६३६ / पुणे | ४.१२.२००६ | १३.१२.२००६ | ९.१.२००६ | -- |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

५१ अ. बुधवार पेठ या मिळकतीच्या तळघराच्या व तळमजल्याच्या नकाशाच्या प्रमाणित प्रती, सदर मिळकतीच्या समोर मोठा खड्डा असताना कनेक्शन सर्टिफिकेट कसे दिले याबाबत.

## विवेचन

कर्ता श्री. प्रभाकर रघुनाथ माने यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, लिका, पुणे यांच्याकडे ५१ अ, बुधवार पेठ, या मिळकतीच्या अनुषंगाने प्रमाणित प्रती माागितली होती. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री. माने यांनी राज्य माहिती पील केले आहे.

च्या काळात आपल्याला माहिती मिळाली असून, आपली कोणतीही तक्रार नसल्याचे दि. १२.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

चा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

निकाली काढण्यात येत आहे.

चा अधिकार अधिनियम २००५ नुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्ज मिळाल्यापासून अर्जावरील निर्णय / माहिती देणे बंधनकारक आहे, याची जाणीव जन माहिती करून देण्यात येत आहे.

८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०२ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. बसवराज शिवप्पा पाटील<br>३७०, किसननगर, अक्कलकोट रोड, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | विभागीय अधिकारी, विभाग क्र.२,<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त (सर्वसाधारण),<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. बसवराज शिवप्पा पाटील यांनी नवीन वॉर्ड क्र. ३३ मध्ये डिसेंबर २००६ पर्यंत विभागीय कार्यालय क्र.२ कडील जलवितरण व ड्रेनेज विभागाकडील माहिती जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी, विभाग क्र.२, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. मूळ अर्जानुसार माहिती दिली असून, अपीलकर्त्यास आता पाहिजे असलेली माहिती मूळ अर्जात नमूद केलेली नव्हती, असे निवेदन पूरक कागदपत्रांसह जन माहिती अधिकारी यांनी सादर केले. दिलेली माहिती खोटी आहे, असे अपीलकर्त्याचे म्हणणे असून रू. ६० लाखांचा गैरकारभार झाल्याची त्यांची तक्रार आहे. या तक्रारीची चौकशी करून त्यावर कार्यवाहीची त्यांची अपेक्षा आहे. अशा कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत मोडत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ८ .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. 18.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०४ / सोलापूर | |
| २ | अपीलकर्ता | श्री. मुकूंद डोंगरी काटे<br>४६७, आवसेवस्ती, आमराई,<br>लक्ष्मी पेठ, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सचिव, सह्याद्री प्रशाला, दमाणीनगर,<br>आवसेवस्ती, लक्ष्मी पेठ, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. मुकुंद डोंगरी काटे यांनी माहे जानेवारी २००४ ते माहे मार्च २००७ पर्यंत सेवामुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या साक्षांकित प्रतींची मागणी केली होती.

वरील तिन्ही पक्षकारांशील चर्चा व त्यांनी सादर केलेली निवेदने, चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता अपीलकर्त्यास १५ दिवसांच्या आंत माहिती देण्याचे माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांना नमूद केले आहे.

अपीलकर्त्याने दि. २६.६.२००८ रोजीच्या अर्जान्वये आवश्यक माहिती मिळाली असल्याने आता कोणताही तक्रार नाही, त्यामुळे अपील निकाली काढावे, असे आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 29 .७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०५ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. मुकुंद डोंगरी काटे<br>४६७, आवसेवस्ती, आमराई,<br>लक्ष्मीपेठ, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | करआकारणी वसुली अधिकारी,<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त (स),<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |

सोलापूर महानगरपालिका, सोलापूरने घोषित केलेल्या झोपडपट्टीमधील एखादी व्यक्ती मयत झाल्यास त्याची नोंद कोणत्या आधारे केली जाते, त्या शासन निर्णयाच्या नकला, तसेच सन २००० नंतरच्या आवसेवस्ती, आमराईमधील खाजगी जागा विकत घेऊन घरे बांधली त्याची नोंद (गलिच्छ वस्ती सुधारणा) मध्ये कोणत्या आधारे केली, त्याची सविस्तर माहिती व शासन निर्णयाची प्रत, सन २००० पासून आजपर्यंत नवीन नोंदी लावण्यासाठी जे अर्ज दाखल झाले त्याच्या साक्षांकित प्रती व सविस्तर माहिती अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा करआकारणी वसुली अधिकारी, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे मागितली होती.

वरील घटकांमधील चर्चेत अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ३० दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. श्री. काटे यांची मुख्य मागणी ही झो.क्र.४३७ वर त्यांचे मयत पत्नीचे जागी वारसांची नोंद करण्याची दिसते. त्यांनतर दि.४.७.२००८ च्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा कर आकारणी व कर संकलन प्रमुख, सोलापूर महानगरपालिका यांनी आयोगास लेखी अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये झो.क्र. ४३७ बाबत सोलापूर जिल्हा न्यायालयात केस नं.६४/२००० अन्वये दावा दाखल असून मूळ जागेचे मालक श्री. नागप्पा शिवशंकर आवसे यांनी सदरच्या जागेवर स्वतःचा मालकी हक्क दि. १७ सप्टेंबर २००७ रोजी

सिध्द केला आहे व त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांना देऊन श्री. मुकुंद डोंगरी काटे यांचे मयत पत्नीचे जागी वारसनोंद न करणेबाबत लेखी अर्ज दिलेला आहे, असे नमूद केले आहे. तसेच श्री. काटे यांच्याकडे जागा खरेदीबाबत कोणतेही पुरावे नसल्याने न्यायालयाच्या आदेशानुसार झो.क्र. ४६७ वर त्यांचे नाव लावण्यात आलेले नाही. कार्यालयाकडे उपलब्ध सर्व माहिती त्यांना दि. ५.७.२००७ च्या पत्राने पुरविण्यात आलेली आहे, मात्र अभिलेख जुने असल्याने विलंब झाला असल्याचा खुलासा त्यांना केला आहे.

मागितलेली माहिती विस्तृत व मागणी ढोबळ स्वरूपाची आहे. माहिती नेमकेपणाने मागण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. विनायक रंगनाथ गोसावी<br>आमे.बी.७, विलोज को.ऑप. हौ. सोसायटी लि., पाईपलाईन रोड, बालकूम, जि. ठाणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, करमाळा, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, करमाळा, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. विनायक रंगनाथ गोसावी यांनी मौजे बिटरगाव येथील सनद नं. १२०० दि. २४.४.१८६२ ची नक्कल, मौजे ढोकी येथील ११९९ दि. २४.४.१८६२ ची नक्कल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करमाळा, जि. सोलापूर यांच्याकडे मागितली होती.

सदर माहिती जुनी असल्याने अलिनेशन रजिस्टर आढळून येत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करमाळा व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, करमाळा यांनी लेखी नमूद केले. माहिती विस्तृत स्वरूपाची व खूप जुनी असल्याने ती उपलब्ध करणे शक्य नाही. मात्र अभिलेख ज्या वर्षापासून उपलब्ध आहेत तेथपासून समक्ष पाहणी करणेबाबत अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविले, असे संबंधित पत्राच्या प्रतीसह त्यांनी नमूद केले. १९२९-३० पासून ७/१२ उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. अपीलकर्त्याने पुढील कार्यवाही केल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१ .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.चंद्रशेखर बाबुराव मुळे
द्वारा रविंद्र जीवन नगरकर, प्लॉट नं.५९,
शामनगर, कुपवाड, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ६१+६३+६४/सांगली / २००६ |
| २.सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत कार्यक्रम | १४.५.२००८ |

**३.उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.चंद्रशेखर बाबुराव मुळे
द्वारा रविंद्र जीवन नगरकर, प्लॉट नं.५९,
शामनगर, कुपवाड, ता.मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर श्री.सर्जेराव जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर
श्री.पांडुरंग गणपती साठे

| | |
|---|---|
| ४.जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | दि.१९.६.२००६ (अ.क्र.६१)<br>दि.१७.७.२००६ (अ.क्र.६३)<br>दि.२४.३.२००६ (अ.क्र.६४) |
| ५.जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि.१६.८.२००६ (अ.क्र.६१)<br>दि.१८.७.२००६ (अ.क्र.६३) |
| ६.अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | दि. २४.५.२००६ (अ.क्र.६४) |
| ७.अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि. १६.६.२००६ (अ.क्र.६४) |

८. **मूळ मागणीचा तपशील**

जा.क्र.केमाअ/सुनावणी/कावि/१७५४४-३५, शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर दि.१६.६.२००६ नुसार श्री.ए.जी.खोराटे, शासकीय माहिती अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ, सांगली यांनी आपले कार्यालयास सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती व सदरच्या सुनावणीबाबत अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आपल्या वरिष्ठांना पाठविलेल्या छायांकित प्रती.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर बाबूराव मुळे यांनी 'शासकीय माहिती अधिकारी तथा सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी श्री.ए.जी.खोराटे यांनी शिक्षण उपसंचालक कार्यालयाला सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या' छायांकित सत्यप्रती व त्या संदर्भात अपिलीय प्राधिकाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविलेल्या अहवालाच्या छायांकित सत्यप्रती मागितल्या होत्या. श्री.खोराटे यांच्या संदर्भातील गोपनीय अहवालाच्या सन २००० पासूनच्या प्रतींसह वीस अन्य मुद्दयांची माहितीही श्री.मुळे यांनी अन्य एका अर्जाद्वारे मागितली होती. प्राथमिक शिक्षण मंडळाकडील प्राथमिक शाळा तपासणीच्या अहवालानुसार केलेल्या कारवाईचा पुराव्यासह तपशीलही त्यात मागितला होता. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले. श्री.मुळे यांना माहिती देण्यात आली असून त्यात अपूर्णता असल्यास नगरपालिका शिक्षण मंडळ, सागली यांच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी, असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पत्राद्वारे कळविले. 'प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून माहिती व न्याय मिळण्याची शक्यता वाटत नाही,' असे नमूद करुन श्री.मुळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.मुळे यांनी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी श्री.ए.जी.खोराटे यांच्या संदर्भातील माहिती प्रामुख्याने मागितली आहे. त्यातील बहुसंख्य माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. गोपनीय अहवालाच्या सत्यप्रती माहिती-अधिकारात देता येतील किंवा कसे याबाबत शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडून मार्गदर्शन मागविल्याचे त्यांनी श्री.मुळे

यांना कळविले. अन्य माहिती शिक्षण मंडळाकडून घेण्यास सांगण्याऐवजी जन माहिती अधिकाऱ्यांनी तो अर्ज शिक्षण मंडळाच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे पाठवावयास हवा होता. तसे त्यांनी केलेले नाही. मात्र शिक्षण उपसंचालक कार्यालयानेच ही माहिती मिळवून द्यावयास हवी होती, हे श्री.मुळे यांचे म्हणणे योग्य नाही. गोपनीय अहवालाच्या सार्वजनिक हिताचे प्रयोजनही ते स्पष्ट करु शकलेले नाहीत. अशा स्थितीत त्रयस्थ पक्ष म्हणून संबंधिताची बाजू जाणून घ्यावी लागेल. मात्र त्याव्यतिरिक्तची देय माहिती दिली जाणे आवश्यक आहे. शाळा तपासणी अहवालांच्या संदर्भात अपीलकर्त्याला आवश्यक असल्यास योग्य ते शुल्क भरुन अभिलेखाचे अवलोकन करता येईल.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत २००३ ते २००६ या कालावधीत बांधलेल्या खोल्या आदींचा तपशील श्री.मुळे यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. ती वेळेत मिळाली नसल्याचे श्री.मुळे यांचे म्हणणे आहे. परंतु विहित मुदतीत माहिती दिली असून शाळेशी व वॉर्ड समितीशी संबंधित असलेली माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास १५ दिवसात द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांनी दिला. त्यानुसार माहिती दिली, असे श्री.खोराटे यांचे म्हणणे आहे. परंतु ती 'पूर्णत: विसंगत, अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे असे वाटते,' असे नमूद करुन श्री.मुळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील( अ.क्र.६४) केले आहे. मागणी केलेल्या माहितीचा कालावधी संदिग्ध होता, त्यामुळे संपूर्ण कालावधीचा खर्च कळविला. बांधकाम पूर्ण झालेल्या खोल्या व बांधकाम पूर्ण असलेल्या खोल्या अशी विभागणी द्यावयाची राहिली. सबंधित मुख्याध्यापक व वॉर्ड शिक्षण समिती यांच्याकडून टेस्ट रिपोर्ट उपलब्ध करुन घेतले व जसेच्या तसेच दिले. तांत्रिक चुका राहिल्या असल्या तरी रास्त माहिती देण्याचा प्रयत्न वेळोवेळी आपण केला आहे, असे श्री.खोराटे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. शाळा खोल्या बांधकामामधील भ्रष्टाचार व नियमांची पायमल्ली उघडकीला येऊ नये म्हणून आपल्याला खोटी माहिती देण्यात आली आहे, असा आक्षेप श्री.मुळे यांनी घेतला आहे. मात्र माहिती खोटी आहे असे अपीलकर्त्याला 'वाटते' यावरुन ती खोटी आहे, असे सिध्द होत नाही.

तसेच अपीलकर्त्याने प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील करणे आवश्यक होते. कायद्यानुसार निर्धारित प्रक्रिया पार न पाडता स्वत:ला हवे त्या पध्दतीने अर्ज व अपिले करण्याची श्री.मुळे यांची कृती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील क्र.६१ व ६३ अमान्य. अपील क्रमांक ६४ अंशत: मान्य.

(२) सर्व शिक्षा अभियानासंदर्भातील अभिलेखांचे अवलोकन जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास नि:शुल्क करु द्यावे व त्यांना पाहिजे असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपीलकर्त्यास नि:शुल्क द्याव्यात मात्र हे शुल्क तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका श्री.ए.जी.खोराटे यांच्याकडून भरुन घ्यावे व त्याचा पूर्तता अहवाल दि.२१.५.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर न झाल्यास संबंधित कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि.५.७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

131452008

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६११ + ६१२ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. यशवंत रावजी जगताप<br>मु.पो. कान्हाटी, ता. बारामती, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कान्हाटी,<br>ता. बारामती, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | विस्तार अधिकारी ( पंचायत )<br>पंचायत समिती, बारामती, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. यशवंत रावजी जगताप यांनी श्री. दादा श्रीरंग जगताप यांना ग्रामपंचायतीमार्फत दिलेल्या घरकुलाच्या अनुषंगाने एकूण सहा मुद्दयांची माहिती मागितली होती.

वरील तीन घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. अपीलकर्त्यास दहा दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी मान्य केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जास विहित मुदतीत उत्तरे दिली जातील याची दक्षता घ्यावी, अशी समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी उर्वरित माहिती अपीलकर्त्यास देऊन, त्यांचा पूर्तता अहवाल दि. २५.७.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. २१.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. तैनूर शफिर शेख<br>मु.पो. आप्पासो पवार मार्ग, शकुंतला लॉन्स् मंगल कार्यालयासमोर, श्रावणगल्ली, बारामती,<br>ता. बारामती, जि. पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, बारामती<br>जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त, (सामान्य प्रशासन विभाग)<br>विधान भवन, पुणे विभाग, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. तैनूर शफिर शेख यांनी बारामती नगरपरिषद, बारामती यांच्या परवानगीने दि. १५.७.२००६ ते दि. २४.७.२००६ या कालावधीत लावण्यात आलेल्या फलकांच्या अनुषंगाने एकूण चार मुद्दयांची माहिती मागितली होती.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने दि. १२.१२.२००७ रोजीच्या अर्जान्वये आयोगास कळविले आहे. याबाबतचा तपशील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी निवेदनात नमूद केला आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २३.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. अर्जुन निवृत्ती मेदनकर<br>८३३, आळंदी, ता. खेड, जि. पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद,<br>आळंदी, जि. पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग) व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांचे कार्यालय, विधान भवन, पुणे-१ | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. अर्जुन निवृत्ती मेदनकर यांनी आळंदी नगरपरिषदेच्या सन २००१ ते मे २००६ या कालावधीतील जमाखर्चाच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने आयोगाकडे अपील दाखल केले. दरम्यान आपल्याला माहिती मिळाली असल्याने आपली कोणतीही तक्रार राहिली नाही. त्यामुळे अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने दि. ९.६.२००८ रोजी आयोगास कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनीही दि. १४.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये ते नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २.७.२००८

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५५ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. नामदेव शामराव नालंदे<br>व्हील कॉलनी, बारामती, जि. पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रशासन अधिकारी, आरोग्य उपसंचालक कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवन समोर, पुणे-४११ ००१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवन समोर, पुणे-४११ ००१ | हजर |

अपीलकर्ता श्री. नामदेव शामराव नालंदे यांनी शिपाई, कक्षसेवक व औषध निर्माता या पदाच्या भरतीच्या अनुषंगाने एकूण ०४ मुद्दयांची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीकरीता ५०/- रू. शुल्क भरण्याबाबत कळविले. परंतु अपीलकर्त्याने शुल्क न भरता अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यावर निर्णय घेतला नाही. अपीलकर्त्याने माहितीसाठीचे शुल्क भरल्यास माहिती उपलब्ध करून देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कमाल ४५ दिवसांच्या मुदतीत अपिलाचा निर्णय करणे बंधनकारक आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याची समज अपिलीय प्राधिकारी यांना देण्यात येत आहे.

पुणे
दि. २१.७.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६०/ पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुधीर माधव जोशी<br>फ्लॅट क्र.१५, इमारत क्र.२, ५८७, दत्तप्रसाद सोसायटी, पुणे सिंहगड रस्ता, पुणे-३० | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी वाई अर्बन को.ऑप. बँक लि. वाई जि. सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | वाई अर्बन को.ऑप. बँक लि. वाई | गैरहजर |

अपीलकर्त्याने वाई अर्बन को.ऑप. बँकेकडे माहितीच्या अधिकारान्वये भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार एन.पी.ए. अकौंट तडजोडीसंबंधी तपशील मागितला होता.

नागरी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नसल्याचे प्रतिपादन सहव्यवस्थापक, प्रधान कार्यालय, वाई अर्बन को.ऑप. बँक यांनी दि. १२.१२.२००७ चे पत्रान्वये केले आहे. नागरी सहकारी बँका माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येतात की नाही, याबाबत न्यायालयीन बाबींमुळे तूर्त 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचा आयोगाचा निर्णय असल्यामुळे बँकेचे म्हणणे मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३.७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री नितीन जगताप<br>मु.पो.हिंगणगाव, ता.इंदापूर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय कृषि अधिकारी,<br>राजगुरुनगर-खेड, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, पुणे,<br>शिवाजीनगर, पुणे-५ | हजर |

अपीलकर्ता श्री. नितीन जगताप यांनी राजगुरूनगर व हवेली अंतर्गत झालेल्या रोजगार हमी योजनेच्या अनुषंगाने माहिती मागितली होती.

वरील घटकांमधील चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता अपीलकर्त्याने आवश्यक असणारी माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. दारिद्र्य रेषेखालील उत्पन्न गटात येत असेल तरच अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली तशा प्रमाणपत्रासह अर्ज करावा. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे शुल्क भरणे आवश्यक राहील.

पुणे
दि. २१.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

१२.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६८ + ६६९ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री नितीन जगताप<br>मु.पो.हिंगणगाव, ता.इंदापूर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | १. कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे<br>२. कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. नितीन जगताप यांनी आपल्या विभागात चालू असलेल्या कामाचे टेंडर, ठेकेदार व कामाच्या सद्यस्थिती या संबंधित माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, विभाग पुणे यांच्याकडे मागितली होती.

वरील सर्व घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. तसेच जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती दिल्याचे नमूद केले असून अपीलकर्त्याने आवश्यक असणारी माहिती मिळाल्याचे मान्य केले आहे. अपीलकर्त्याने आपण दारिद्र्य रेषेखाली असल्याचा पुरावा म्हणून वडिलांच्या नावाचा दाखला दिल्याने माहिती दिली नव्हती, तसेच एकाच स्वरूपाच्या माहितीसाठी चार अर्ज केले होते, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. अशा प्रकारे एकाच माहितीसाठी अनेक अर्ज करून सर्व यंत्रणाचा व अपिलांद्वारे आयोगाचा वेळ घेऊ नये, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

११.६.०८

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. दारिद्र्य रेषेखालील उत्पन्न गटात येत असेल तरच अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली तसा प्रमाणपत्रासह अर्ज करावा. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे शुल्क भरणे आवश्यक राहील.

पुणे
दि. २१.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

१.श्री.आनंदराव रामचंद्र पवार
२.श्री.दिपक लक्ष्मण सुपुगडे
मु.मराठवाडी, पो.ढेबेवाडी, ता.पाटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय, पाटण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, पाटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५+१५८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** १.श्री.आनंदराव रामचंद्र पवार
मु.मराठवाडी, पो.ढेबेवाडी, ता.पाटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय, पाटण, जि.सातारा श्री.सतीश वसंत धुमाळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.८.२००६ }<br>दि.२१.९.२००६ } (अ.क्र.६५)<br>दि.३.११.२००६ (अ.क्र.१५८) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.१०.२००६ (अ.क्र.६५)<br>दि.१.१२.२००७ (अ.क्र.१५८) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.११.२००६(अ.क्र.६५)<br>दि.६.१२.२००६ (अ.क्र.१५८) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.५.२००७ (अ.क्र.६५)<br>दि.३०.५.२००७ (अ.क्र.१५८) |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन १९९९ ते सन २००६ या कालावधीतील स्वस्त धान्य दुकान एपीएल, बीपीएल व अंत्योदय योजनेतील लाभधारकांची यादी. या कालावधीत झालेल्या गैरव्यवहार, बोगस लाभार्थी शासकीय यंत्रणेस कळवून कारवाई होणेबाबत. परगावी वास्तव्यास असणारे व मयत लाभार्थी शासनाचे निदर्शनास आणून देणे बाबत. बोर्डावरील कार्डसंख्या ही २८७ असून दिलेली यादी २५३ ग्राहकांची आहे, तरी २८७ कार्डधारकांची यादी मिळावी. |

## विवेचन

मराठवाडी, जि.सातारा येथील स्वस्त धान्य दुकानातील शिधापत्रिका, अंत्योदय ग्राहक दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती इत्यादी बाबतची सन १९९९ ते २००६ या कालावधीतील माहिती अपीलकर्ता श्री.आनंदराव पवार आणि श्री.दीपक लक्ष्मण सुपुगडे यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पाटण, जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. आपल्याला अपुरी व चुकीची माहिती मिळाली, म्हणून श्री.पवार यानी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पाटण, जि.सातारा यांच्याकडे अपील केले. श्री.पवार यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे शिधापत्रिकाधारकांच्या संदर्भात चौकशीची कार्यवाही अलाहिदा सुरु आहे. उपलब्ध माहिती त्यांना देण्यात आली असून त्यातील त्रुटींबाबतची कार्यवाही हा स्वतंत्र विषय आहे, असे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पाटण श्री.सतीश वसंत धुमाळ यांनी अपील फेटाळले. परंतु चुकीची माहिती दिली असल्याच्या कारणावरुन श्री.पवार यांनी आयोगाकडे दोन अपिले केली आहेत. श्री.दिपक लक्ष्मण सुपुगडे हेही सहअर्जदार आहेत.

खरोखर गरजू असलेल्या व्यक्तींना स्वस्त धान्य दुकानातील सवलतींचा फायदा मिळत नाही. अंत्योदय योजनेतील लाभार्थी म्हणून सधन व्यक्तींचा समावेश आहे. दारिद्र्यरेषेखालील यादीत अपात्र व बनावट व्यक्तींचा समावेश आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार असावा असे दिसते, म्हणून आपण या माहितीचा पाठपुरावा करीत आहोत, असे प्रतिपादन श्री.पवार यांनी आयोगापुढील सुनावणीत केले.

यादीबाहेरील, तसेच मयत, गाव सोडून गेलेले इत्यादी व्यक्तींबाबतची तपासणी करण्यात आली. त्या त्या तारखांना पुरवठा शाखेत उपलब्ध असलेल्या माहितीनुसार तपशील देण्यात आला. तपासणीनंतर ही आकडेवारी बदललेली असल्यामुळे यादीत तफावत दिसते. परंतु माहिती चुकीची नाही. संबंधित याद्या अपीलकर्त्यांना अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्री.सतीश धुमाळ यांनी लेखी व तोंडी नमूद केले. २००६ साली २८७ शिधापत्रिकाधारक होते. तपासणीनंतर त्यातील २५३ शिधापत्रिकाधारक वैध ठरले. दारिद्र्यरेषेखालील ६२ शिधापत्रिकाधारक होते. त्यातील ५८ वगळले गेले. अशा प्रकारे अपीलकर्त्याला अपेक्षित असलेल्या मूळ मुद्दयाच्या अनुषंगाने कार्यवाही केली गेली आहे, असेही श्री.धुमाळ यांनी नमूद केले. मात्र शिधापत्रिकाधारक, कुटुंबप्रमुख, कुटुंबातील व्यक्तींची नांवे इत्यादी तपशील अपीलकर्त्यांनी मागितला होता, परंतु २००३ सालापासून अशा प्रकारचा तपशील न ठेवता फक्त कुटुंब प्रमुखाचे नांव, कुटुंबातील व्यक्तींची संख्या व युनिटसंख्या असा तपशील ठेवला जातो. तो श्री.पवार यांना देण्यात आला आहे, असेही श्री.धुमाळ यांनी नमूद केले.

तहसीलदार, पाटण श्री.धुमाळ यांचे निवेदन लक्षात घेता शिधापत्रिकेच्या याद्या सदोष होत्या, दारिद्र्यरेषेखालील सवलतींचा लाभ अपात्र व्यक्तींना दिला जात होता, तसेच यादीबाहेरच्या काही व्यक्तींचा शिधापत्रिकाधारक म्हणून समावेश होता, ही वस्तुस्थिती स्पष्ट होते. त्यामुळे अपीलकर्त्याच्या मूळ मागणीनुसार तपासणी होऊन नेमकी माहिती दिली जाणे आवश्यक आहे. ती करुन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांनी १५ दिवसात आयोगाला अहवाल सादर करावा असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला होता. त्यानुसार गावकामगार तलाठी, मौजे मराठवाडी, ता.पाटण यांच्याकरवी शिधापत्रिकांची फेरतपासणी करण्यात आली. २८४ शिधापत्रिकांची फेरतपासणी करुन दि.१३.३.२००८ रोजी त्यांनी अहवाल सादर केला. या अहवालानुसार एपीएल योजनेमध्ये १९९, दारिद्र्यरेषेखालील ४ व अंत्योदय योजनेमधील २० असे एकूण २२३ शिधापत्रिकाधारक आहेत, असे या अहवालात नमूद केले असून श्री.पवार यांना दि.२४.४.२००८ रोजी ही माहिती नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात आली आहे असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पाटण श्री.धुमाळ यांनी दि.३०.४.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या अहवालात कळविले. परंतु आपल्याला

अद्यापही पूर्ण माहिती मिळालेली नाही व दि.१.३.२००७ रोजी ग्राहकसंख्या २५३ असलेल्या यादीची व लोकसंख्या, युनिटसंख्या व शिधापत्रिकांची संख्या यात नैसर्गिकपणे वाढ न होता घट झाल्याचे दिसून येते. त्याबाबतची माहिती मिळावी, अशी मागणी श्री.पवार यांनी दि.२१.५.२००८ रोजी आयोगाला पाठविलेल्या निवेदनात केली आहे. माहिती मागणीच्या मूळ अर्जाव्यतिरिक्तची, तसेच प्रशासकीय कार्यवाहीची अशी ही मागणी असली व सर्वसाधारणतः ते माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मध्ये ग्राह्य धरण्यात येत नसले, तरी हा विषय व्यापक जनहिताचा व सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेचा आहे. आणि सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा गाभाभूत भाग आहे, हे लक्षात घेता अशा पारदर्शकतेसाठची कार्यवाही हा या अधिनियमाचा महत्त्वाचा भाग मानावा लागेल. सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानदार श्री.मारुती धोंडिबा शिंदे परवाना क्र.२११८ व केरोसीन परवाना क्र.०५२७४३/६१५ यांच्या दि.२.९.२००६ व दि.३०.१०.२००६ रोजी मिळालेल्या याद्या वेगवेगळ्या असून दोन्हींमध्ये तफावत आहे. शिधापत्रिका क्र.६९६४९३ अस्तित्वात असूनही त्याची माहिती दिलेली नाही. ग्राहक संख्या व युनिट संख्या यातही तफावत आहे, असे श्री.पवार यांनी नमूद केले.

स्वस्त धान्य दुकानांद्वारे पात्र व्यक्तींनाच लाभ मिळतो आहे की नाही, त्यातील सरकारी-सार्वजनिक निधीचा योग्य विनियोग होतो आहे की नाही, अशा सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयांचा त्यात समावेश आहे. याबाबतची माहिती मिळणे हा नागरिकांचा हक्क आहे.

शिधापत्रिकांमध्ये बनावट नावे असणे, मृतांची नावे कमी न होणे, दारिद्र्यरेषेखालील यादीत अपात्र व्यक्तींचा समावेश असणे असे प्रकार असल्याचे मराठवाडी या छोट्याशा गावातील तपासणीतूनही स्पष्ट होते. दारिद्र्यरेषेखालील याद्यांची व दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रांची तपासणी होण्याची गरजही त्यातून प्रकर्षाने जाणवते.

## आदेश

(१) मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) मराठवाडी येथील शिधापत्रिकांबाबतची सखोल चौकशी करुन, अपात्र व्यक्तींना दिलेल्या लाभांबाबतची, तसेच दारिद्र्यरेषेखालील यादीतील समावेशासाठी दिलेल्या प्रमाणपत्रांबाबतची जबाबदारी निश्चित करुन त्याअनुषंगाने संबंधितांवर केलेल्या कारवाईची माहिती तहसीलदार, पाटण, जि.सातारा यांनी दि.१५.८.२००८ पर्यंत अपीलकर्त्याला द्यावी व आयोगाला सादर करावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२१.७.२००८

july-०८ solapursangli४६-४९